
शेतकरी प्रकाशन ॥ २२ ॥

# जागतिक व्यापार संघटनेचा ओनामा

(ABC of the WTO चे स्वैर मराठीकरण)




शेतकरी प्रकाशन

# जागतिक व्यापार संघटनेचा ओनामा

**(ABC of the WTO चे स्वैर मराठीकरण)**

शेतकरी प्रकाशन

शेतकरी प्रकाशन ॥२२॥

■

**जागतिक व्यापार संघटनेचा ओनामा** ★

■

प्रकाशक :
**सुमित्रा अरविंद कुलकर्णी**
**शेतकरी प्रकाशन**
द्वारा शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय,
अंगारमळा, आंबेठाण,
जि. पुणे ४१०५०१.

■

प्रकाशन दिनांक व ठिकाण :
२७ जानेवारी २००५, जालना

■

मुद्रक :
**मा. वि. दात्ये**
**गणेश प्रिंटर्स**
६९२ बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२.
फोन : २४४५११४४

■

मराठीकरण सहाय्य :
श्री. ज्ञानेश्वर एम्. शेलार,
औरंगाबाद

■

निर्मिती व वितरण मूल्य : रु. १०/-

---

★ (CUTS, जयपूर या ग्राहकहितरक्षणासाठी कार्य करणाऱ्या संस्थेने प्रकाशित केलेल्या 'ABC of the WTO' या पुस्तिकेचे स्वैर मराठीकरण)
या पुस्तिकेतील सर्व कल्पनाचित्रे मूळ इंग्रजी पुस्तकेतील आहेत.



# अनुक्रमणिका

१. कर आणि व्यापारविषयक सर्वसाधारण करार (GATT) म्हणजे काय? ........ ९

२. गॅट वाटाघाटींची उरुग्वे फेरी काय आहे व अगोदरच्या फेऱ्यांपेक्षा वेगळी कशी आहे? ........ ११

३. जागतिक व्यापार संघटना (WTO) म्हणजे काय? ........ १३

४. GATT आणि WTO यांमध्ये काय फरक आहे? ........ १५

५. WTO चे कार्य कसे चालते? ........ १७

६. WTO समस्यांची व समस्या-क्षेत्रांची निवड कशी करते? ........ १९

७. WTO मध्ये गरीब देशांना काय सवलती देण्यात आल्या आहेत? ........ २१

८. भारताने WTO चे सदस्य होणे का आवश्यक आहे? ........ २३

९. WTO भारतासाठी संधी आहे की संकट? ........ २६

१०. सर्वसामान्य माणसाला WTO ची माहिती असणे का आवश्यक आहे? ........ २७

# दोन शब्द प्रकाशनाचे...

दहा वर्षांच्या प्रदीर्घ खंडानंतर शेतकरी प्रकाशन आपल्या वाचकांच्या हाती ही छोटी पुस्तिका देत आहेत.

वर्षानुवर्षे परिश्रम घेऊन उभारलेली वास्तू मोडून पाडण्यात फारसा वेळ लागत नाही. ती पाडणारांना ती उभारण्यात खर्च झालेल्या परिश्रमांशी काही देणेघेणे नसते. तद्वतच्, जवळजवळ पन्नास वर्षांच्या प्रदीर्घ प्रयत्नांती जन्मास आलेली जागतिक व्यापार संघटना (WTO) मोडून काढण्यासाठी जगभरच्या विकासविरोधी शक्ती त्यांच्या जिवाचे रान करीत आहेत. सर्वसामान्य जनतेला या भांडणाची कारणमीमांसाही कळत नाही. ही संस्था कशी स्थापन झाली, तिचे कार्य कसे चालते, तिचे फायदेतोटे काय इत्यादी माहिती सर्वसामान्यांना समजेल अशा स्वरूपात दिलेली एक पुस्तिका ग्राहकांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक ठेवण्यासाठी कार्यरत असलेल्या, जयपूर येथील CUTS या संस्थेने जुलै २००२ मध्ये प्रकाशित केली. 'ABC of the WTO' हे तिचे शीर्षक.

शेतकरी संघटना ही भारतातील एकमेव चळवळ आहे जिने खुल्या अर्थव्यवस्थेचा व त्यासाठी एखाद्या जागतिक व्यापार संघटनेचा अगदी सुरुवातीपासून पुरस्कार केला. डंकेल प्रस्तावावरील वादविवादाच्या वेळी शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी शेतकरी समाजाला तो प्रस्ताव व त्या प्रस्तावाचे फायदेतोटे अत्यंत सोप्या भाषेत समजावून दिले आणि परिणामी, शेतकरी समाजात खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्वीकाराचा निर्धार तयार झाला. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेविषयी, कार्यप्रणालीविषयी अत्यंत सोप्या शब्दांत माहिती देणाऱ्या या पुस्तिकेचे मराठी रूपांतर या शेतकरी भावाबहिणींना उपलब्ध करून देणे, म्हणूनच संयुक्तिक ठरते.

या पुस्तिकेचे मराठीकरण करण्यात औरंगाबादचे श्री. ज्ञानेश्वर म. शेलार यांचे बहुमोल सहकार्य लाभले. पुस्तिकेच्या छपाईकामी गणेश मुद्रा व गणेश प्रिंटर्स तर बांधणीसाठी श्रीराज मुद्रणालयाचे सहकार्य लाभले. या सर्वांचा कृतज्ञतापूर्वक ऋणनिर्देश.

मूळ पुस्तिका उपलब्ध करून देणाऱ्या CUTS या संस्थेचा ऋणनिर्देश करण्यास शब्दच अपुरे पडतील.

शेतकरी प्रकाशन सुरू करणारे डॉ. अरविंद वामन कुळकर्णी आज आपल्यात नाहीत. त्यांनी सुरू केलेले हे कार्य पुढे चालू ठेवण्याचा निर्धार करून त्यांच्या स्मृतीस ही पुस्तिका अर्पण करीत आहे.

**सुरेशचंद्र म्हात्रे**
'शेतकरी प्रकाशन'करिता

२७ जानेवारी २००५



# प्रस्तावना

WTO ने जागतिकीकरणाचा, वैश्विकीकरणाचा पाया घातला आहे. वैश्विकीकरणाचे ते साधन आहे. WTO चे अंतरंग उकलण्यापूर्वी थोडा इतिहास पाहणे उद्‌बोधक ठरेल.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेतील ब्रेटन वुड्स या शहरी ऐतिहासिक बैठक झाली. जागतिक अर्थव्यवस्थेला दिशा देण्यासाठी व नियंत्रणासाठी इंटरनॅशनल मॉनिटरी फंड (IMF), वर्ल्ड बँक व इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (ITO) असे तीन आधारस्तंभ निर्माण करण्याची कल्पना या बैठकीत मांडण्यात आली. आंतरराष्ट्रीय दिवाळखोरीपासून एखाद्या देशाला वाचविण्यासाठी IMF व विभागवार कर्ज वितरणासाठी वर्ल्ड बँक अशा दोन संस्था ब्रिटेन वुड्स येथे ठरल्याप्रमाणे निर्माण झाल्या व भरभराटीस आल्या.

तिसरे बाळ इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (ITO) मात्र जन्मलेच नाही. ITO च्या निर्मितीत अनेक अडथळे आले. विशेषत:, अमेरिकन काँग्रेसने त्याला मोठा विरोध केला. आपले सार्वभौमत्व व जागतिक महासत्ता म्हणून असलेले स्थान आपण गमावून बसू अशी भीती अमेरिकन काँग्रेसला वाटली. या घटनाक्रमानंतर बऱ्याच पश्चिमी देशांनी आपापसात व्यापार करार केले. हे द्विपक्षीय करारच १९४७ साली स्थापन झालेल्या GATT या जागतिक व्यापार कराराची पहिली पायरी होय. गॅट ९५ पर्यंत अस्तित्वात होता. स्थापनेच्या वेळी गॅटवर २३ देशांनी सह्या केल्या. उल्लेखनीय म्हणजे या २३ प्रथम सह्या करणाऱ्या संस्थापक देशांमध्ये भारतही होता.

या जागतिक व्यापार कराराला पूर्णत्व आले ते १ जानेवारी १९९५ रोजी, तेव्हा या कराराचे जागतिक व्यापार संघटना (WTO) असे नामकरण झाले. उरुग्वे येथे झालेल्या वाटाघाटींच्या आठव्या फेरीत बहुतेक सर्व जागतिक व्यापार करारांना पूर्णत्व देण्यात आले आणि WTO ची स्थापना झाली.

जागतिक अर्थव्यवस्थेचे नियंत्रण करणाऱ्या तीन स्तंभाच्या ब्रिटेन वुड्स येथे मांडल्या गेलेल्या कल्पनेला WTO च्या स्थापनेने मूर्त स्वरूप आले. WTO च्या स्थापनेने नियमांचा पाया असलेली आंतरराष्ट्रीय व्यापारयंत्रणा उभी राहिली आणि आंतरराष्ट्रीय व्यापारसंबंध सुरळीत चालण्यासाठी निश्चित मापदंड ठरवण्यात आले.

गॅटमध्ये समाविष्ट देशांनी आठ वर्षे उरुग्वे फेरीतील प्रदीर्घ चर्चा करून WTO

ची स्थापना केली. १९९० च्या सुरुवातीस वादविवादामुळे बोलणी फिसकटण्याच्या बेतात होती. मात्र त्यावेळचे गॅटचे महासचिव आर्थर डंकेल यांच्या हस्तक्षेपामुळे ते टळले. त्यांनी तडजोडीचा असा संकलित आराखडा तयार केला, तोच प्रसिद्ध 'डंकेल प्रस्ताव' होय. या कालावधीत प्रसार माध्यमात डंकेल प्रस्तावाविषयी भरभरून छापून येत होते. बऱ्याच चमत्कृतिजनक गोष्टींचाही त्यात समावेश होता. भारताचे भवितव्य धोक्यात आहे असा त्यांचा सूर होता. त्यात काही अंशी तथ्य असते तरी गॅटच्या संस्थापक देशांपैकी एक, एक चांगला आंतरराष्ट्रीय नागरिक असलेला देश म्हणून भारताला व्यापार खुला करण्याच्या प्रक्रियेबाहेर राहणेही शक्य नव्हते. WTO च्या विरोधात भूमिका घेणारे लोक असलेला, भारत हा काही एकमेव देश नाही; असाच विरोध अमेरिकेतूनसुद्धा होत आहे.

असा विरोध असूनही सात वर्षात सर्व सभासद देशांनी या कायदेशीर कराराची अंमलबजावणी सुरू केली आहे. परंतु दुर्दैवाने भारतातील सर्वसामान्य लोकांचे WTO बद्दलचे ज्ञान मात्र अत्यंत तोकडे आहे. अजूनही वादविवाद विशिष्ट वर्गापुरतेच सीमित आहेत. चर्चा फक्त विद्वानांपुरतीच मर्यादित आहे. सर्वसामान्य जनता व राजकारणी यांच्यामध्ये WTO संबंधी सर्वसाधारण अज्ञानच आहे.

१९९९ ला सिएटल येथे झालेल्या WTO च्या मंत्रीपातळीवरील बैठकीतून फारसे काही निष्पन्न झाले नाही. भारतातील उद्योग व्यवसायाला वाहिलेल्या काही दैनिकांनी चांगली कामगिरी बजावली. प्रादेशिक वृत्तपत्रांनीही योग्य प्रसिद्धी दिली. मात्र बातम्या देताना समतोल सांभाळला गेला नाही. योग्य विश्लेषण करण्यात आले नाही. WTO च्या विरोधात एकांगी प्रसिद्धी करण्यात आली. सर्व सामाजिक संस्था व संघटना WTO वर कडवट टीका बहुतांशी चुकीच्या कारणांनी करतात. भडक चित्रण करतात - हे सर्व सत्याला आणि वास्तवाला सोडून, समग्र अभ्यास न करता तुकड्या तुकड्याने एखाद्याच भागावर प्रकाशझोत टाकून ही टीका केली जाते. यामुळे सर्वसामान्यांचा बुद्धिभेद होतो व त्यांचे WTO बद्दलचे गैरसमज वाढतात.

WTO हा जगातील एकमेवाद्वितीय करार आहे, जसे आपण ज्या जगात जगतो ते एकमेवाद्वितीय आहे. रशिया सोडून जगातील सर्व महत्त्वाचे देश WTO त सामील झाले असताना आपण करारातून बाहेर पडून या आंतरराष्ट्रीय व्यापार प्रणालीपासून फटकून राहाणे आपल्याला परवडणारे आहे का? हा प्रश्न सुद्धा अप्रस्तुत आहे. संधीचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल आणि जाचक



तरतुदींपासून जास्तीत जास्त बचाव कसा करता येईल हे पाहणे अधिक इष्ट होईल.

दुर्दैवाने, आपल्या राजकारण्यांचा WTO बद्दलचा दृष्टिकोन प्रतिक्रियात्मक आहे. WTO म्हणजे आपल्या मानगुटीवर बसलेले भूत आहे आणि आता ते कदापिही उतरणे शक्य नाही असे त्यांना वाटते. स्वयंघोषित तज्ज्ञ असा प्रचार करीत आहेत की, आपले म्हणणे WTO त ऐकले जात नाही, समर्थपणे मांडले जात नाही. सत्य असे आहे की जागतिक व्यापारात आपला अर्धा टक्काच सहभाग असूनही WTO त आपल्याला लायकीपेक्षा अधिक महत्त्व दिले जाते. हे केवळ आपण व्यापारात नव्हे पण वाटाघाटीत चतुर आहोत म्हणून शक्य झाले आहे.

अशा परिस्थितीत सर्वसामान्य माणूस गोंधळून गेला आहे. बऱ्याचदा हा करार आपल्या देशासाठी वाईट आहे, WTO तून भारताने त्वरित बाहेर पडायला हवे असे तो ऐकतो, वाचतो; परंतु कुणीही असे प्रश्न उपस्थित करीत नाही की WTO करार का चांगला नाही? आपण बाहेर पडलो तर काय किंमत मोजावी लागेल? आणि बाहेर पडल्याने काय फ़ायदे होणार आहेत?

या शृंगापत्तीचे वर्णन माजी परदेश सचिव व WTO व गॅटसंबंधी तज्ज्ञ मुचकुंद दुबे यांनी वेचक शब्दात केले आहे. ते म्हणतात - 'भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील दर्जा व स्थान लक्षात घेता या नव्या व्यापारपद्धतीतून अलिप्त राहणे भारताला कदापिही शक्य नाही. याउलट, भारताने विकासाची नवी दृष्टी घेऊन WTO शी संबंधित प्रश्न समजावून घेऊन समर्थपणे उभे राहिले पाहिजे. या संदर्भात सर्वात आवश्यक गोष्ट कोणती असेल तर ती पारदर्शकतेची. WTO म्हणजे जणू काही एक महाभयानक प्रकरण आहे आणि त्याच्या विरोधात ठामपणे उभे राहिले पाहिजे अशी भूमिका सरकारने घेतली आहे. लोकांची दिशाभूल करण्यापेक्षा सरकारने WTO चे सर्व बरेवाईट परिणाम लोकांना समजावून सांगून निर्णय लोकांवरच सोडावा.' (An unequal treaty : World Trading Order After GATT, 1996)

आजसुद्धा WTO च्या तरतुदी आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यंत्रणा यांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचा सरकारचा प्रयत्न अत्यंत तोटका आहे.' १९९९ पर्यंत तो नगण्य होता. भारतीय नागरी समाज, सेवाभावी संस्था, संघटना यांनी जाणीवपूर्वक निरपेक्ष बुद्धीने WTO बाबतचे सत्य सांगण्याचा कधी प्रयत्नही केला नाही. नवीन खुल्या व्यापारव्यवस्थेमुळे काही धक्के बसणारच आहेत ते नाकारून चालणार नाही. परंतु सत्य परिस्थितीपासून तोंड लपवून पळून जाण्यापेक्षा ते धक्के

सोसण्यासाठी योग्य पावले उचलणे व काळजी घेणे अधिक संयुक्तिक आहे. खूप संधी उपलब्ध आहेत, फक्त त्या शोधून त्यांचा फायदा उठवायला हवा.

ही पुस्तिका म्हणजे साध्या सरळ व सोप्या भाषेत, प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात सर्वसामान्य माणसाला माहिती देण्याचा प्रयत्न आहे. लोकांना WTO ची माहिती देणे व त्यांच्या ज्ञानात भर घालणे हा यामागचा उद्देश आहे. यामुळे आर्थिक कारभारात अधिक पारदर्शकता व निश्चितता येईल.

पारंपरिक व प्रतिक्रियात्मक पवित्रा घेण्याऐवजी आंतरराष्ट्रीय कराराचा आदर करून संधीचा फायदा घ्यायला हवा. त्याप्रमाणे आपली व्युहरचना करायला हवी.

भारतीय लोकांत WTO विषयी योग्य ती जागृती करणे, त्याच्या माहितीत भर घालणे, हा करार त्यांना समजेल हे पाहणे हाच येथे उद्देश आहे.

भारतीयांना आपल्या संसदेतील प्रतिनिधींमार्फत योग्य ते निर्णय घेऊ द्या, धोरणे ठरवू द्या, WTO त आपली बाजू मांडू द्या, अशामुळे आपण पुढे होणाऱ्या चर्चेच्या फेरीमध्ये अधिक फायदेशीर बोलणी करू शकू. WTO त रहायचे की बाहेर पडायचे ह्याच वाद सतत घालण्यापेक्षा, दोहा येथून सुरू झालेल्या चर्चेच्या फेरीत आपण अधिक काय मिळवू शकू हे पहायला हवे.

दोहा येथे झालेल्या चर्चेच्या फेरीत आपल्या उद्दिष्टाप्रत पोहोचण्यास भारताला मोठे यश मिळाले आहे. कराराची अंमलबजावणी करताना येणाऱ्या समस्यांना प्राधान्य देणे, एखाद्या देशाने दुसऱ्या देशात स्वस्त माल विकून स्थानिक बाजारपेठ पाडू नये यासाठी अँटी डंपीगवर चर्चा घडवून आणणे, पारंपरिक ज्ञान व भौगोलिक वैविध्य जपणे, सार्वजनिक आरोग्यसेवेत आणीबाणीच्या प्रसंगी बुद्धिसंपदेच्या कायद्याचा अडथळा येणार नाही अशी लिखित हमी मिळविणे, कपड्यांवरील निर्यातकरात सूट मिळविणे, WTO च्या मानदंडाप्रमाणे भारतात सध्याच कामगारांना सोयीसुविधा देणे शक्य नसल्याचे मान्य करून घेणे आणि सिंगापूर येथील चार समस्यांवरील बोलणी लांबणीवर टाकणे इ. बाबतीत भारताला यश मिळाले आहे. व्यापार आणि पर्यावरण या विषयात मात्र भारताला काही प्रमाणात तडजोड करावी लागली.

जयपूर
जुलै २००२

**प्रदीप एस. मेहता**
महासचिव, कट्स






# १.
# कर आणि व्यापारविषयक सर्वसाधारण करार (GATT) म्हणजे काय?

कर व व्यापारविषयक सर्वसाधारण करार (General Agreement on Tariffs and Trade) हा जागतिक करार होता ३० ऑक्टोबर १९४७ रोजी युनायटेड नेशन्स बिल्डींग जिनेव्हा, स्वित्झर्लंड येथे या करारात सह्या करण्यात आल्या. करारावर सह्या करणाऱ्या २३ संस्थापक देशांना 'काँट्रॅक्टींग पार्टीज' म्हणून ओळखले जाते. संस्थापक देशांपैकी १२ देश विकसित व उर्वरित विकसनशील देशांपैकी होते. १९४७ साली झालेल्या या कराराची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती :

- हा करार म्हणजे एखादी संघटना किंवा न्यायदान करणारे न्यायालय नव्हते, तर जगातील ८० टक्के व्यापार ज्या वस्तूंचा चालतो अशा वस्तूंवर लादलेल्या करांसंबंधी सर्वसंमत असा जागतिक करार होता.
- गॅट मालांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आचारसंहिता असणारा निर्णयक्षम करार होता. जागतिक व्यापार मुक्त करण्यासाठी उभी केलेली ती यंत्रणा होती.
- व्यापारविषयक करार करणाऱ्या देशांना वेळोवेळी एकत्र येऊन, व्यापारविषयक समस्यांचे निराकरण करण्याचा आणि व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने विचारविनिमय करण्याचा गॅट हा एक मंच होता.
- गॅटच्या नियमांनी व्यापारविषयक वाद व समस्या सोडविणे, देशादेशात संवाद घडवून आणणे, जबाबदाऱ्या शिथील करणे एवढेच नव्हे तर अनैतिक व्यापाराला आळा घालणे या गोष्टी शक्य झाल्या.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक व्यापाराचे नियंत्रण करण्यासाठी

इंटरनॅशनल मॉनिटरी फंड व वर्ल्ड बँकेच्या बरोबरीनेच इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन ITO (आंतरराष्ट्रीय व्यापार संघ) स्थापण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात आली. परंतु वेगवेगळ्या मतभेदांमुळे ITO प्रत्यक्षात अस्तित्वात आला नाही, २३ देशांनी मात्र आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सवलतींबाबत बोलणी चालू ठेवली त्याचेच मूर्त स्वरूप म्हणजे गॅट होय. गंमतीचा भाग म्हणजे चीन गॅटचा संस्थापक देश होता, परंतु १९४९ ला तो गॅटमधून बाहेर पडला. १ जानेवारी १९९५ ला गॅट इतिहासजमा झाला व WTO चा जन्म झाला.

### गॅटचे संस्थापक देश

| | |
|---|---|
| १. ऑस्ट्रेलिया | २. बेल्जियम |
| ३. ब्राझील | ४. ब्रह्मदेश (म्यानमार) |
| ५. कॅनडा | ६. सिलोन (श्रीलंका) |
| ७. चिली | ८. चीन |
| ९. क्युबा | १०. झेकोस्लोव्हाकिया |
| ११. फ्रान्स | १२. भारत |
| १३. लेबनॉन | १४. लुक्झेबर्ग |
| १५. नेदरलँड | १६. न्यूझीलंड |
| १७. नॉर्वे | १८. पाकिस्तान |
| १९. द. ऱ्होडेशिया (झिंबाब्वे) | २०. सीरिया |
| २१. आफ्रिका | २२. इंग्लंड |
| २३. अमेरिका | |

■





# २. उरुग्वे फेरी काय आहे व ती गॅटच्या अगोदरच्या वाटाघाटींपेक्षा वेगळी कशी आहे?

उरुग्वे येथे सप्टेंबर १९८६ मध्ये गॅटच्या वाटाघाटींची आठवी फेरी सुरू झाली. तीच उरुग्वे फेरी होय. ही बोलणी चार वर्षात पुरी व्हावीत असे अपेक्षित होते. परंतु शेतीसारख्या कळीच्या विषयांवरील देशादेशांतील मतभेदामुळे ती अपेक्षित वेळेत पूर्ण होऊ शकली नाहीत.

ही कोंडी फोडण्यासाठी १९९० च्या सुरवातीला गॅटचे महासचिव आर्थर डंकेल यांनी एक सर्वसमावेशक प्रस्ताव तयार केला त्यालाच 'डंकेल प्रस्ताव' किंवा 'डंकेल ड्राफ्ट' असे म्हणतात. १५ डिसेंबर १९९३ ला, डंकेल यांनी तयार केलेली नियमावलीच अंतिम करार म्हणून स्वीकारण्यात आली व त्याला कायदेशीर मान्यता देण्यात आली.

उरुग्वे फेरीतील विविध २८ तडजोडींचा समावेश डंकेल प्रस्तावात करण्यात आला होता. मूळच्या १९४७ च्या गॅट करारात फक्त आंतरराष्ट्रीय वस्तू व्यापाराचे नियमन करणारे नियम होते. उरुग्वे फेरीत मात्र या व आणखी, बुद्धिसंपदा व सेवा अशा नवीन दोन विषयांवर बोलणी झाली.

गॅट करारात समाविष्ट देशांच्या, १९४७ ते १९९४ या कालावधीत वाटाघाटींच्या आठ फेऱ्या झाल्या. पहिल्या सहा फेऱ्या आयातकर कमी करण्याविषयी होत्या. सातवी फेरी करांव्यतिरिक्त जी बंधने असतात त्याविषयी होती. आठवी उरुग्वे फेरी पूर्वीच्या सर्व फेऱ्यांपेक्षा वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण होती कारण, या फेरीत वाटाघाटींसाठी कित्येक नवीन विषयांचा समावेश करण्यात आला.

१४ नोव्हेंबर २००१ ला WTO च्या सदस्य देशांनी मंत्रीपातळीवरील


जाहिरनामा स्वीकारला. याच वेळी कतार या देशातील दोहा येथून नवव्या फेरीची बोलणी सुरू करण्यात आली. WTO ची ही पहिली फेरी असून ती १ जानेवारी २००५ पर्यंत चालेल.

### मे २००२ पर्यंतचा घटनाक्रम

| फेरी | वर्ष | महत्त्वाचे फलित | देश |
|---|---|---|---|
| १ | १९४७ | गॅटवर सह्या | २३ |
| २ | १९४९ | विशिष्ट उत्पादनावरील आयात करात कपात | १३ |
| ३ | १९५०-५१ | विशिष्ट उत्पादनावरील आयात करात कपात | ३८ |
| ४ | १९५६ | आयात कर | २६ |
| ५ (डिल्लन फेरी) | १९६०-६१ | युरोपियन कम्युनिटीचा गॅटमध्ये समावेश व आयात करात २०% कपात | २६ |
| ६ (केनेडी फेरी) | १९६४-६७ | कारखानदारी वस्तूंवरील निर्बंधात ३३% कपात | ६२ |
| ७ (टोकियो फेरी) | १९७३-७९ | कराव्यतिरिक्तची बंधने वगैरे | १०२ |
| ८ (उरुग्वे फेरी) | १९८६-९३ | शेती, सेवा *TRIPS, TRIMS* | १२३ |
| ९ (दोहा फेरी) | २००१-०२ | बोलणी पुढे चालू - व्यापार व पर्यावरण यांच्यातील परस्पर संबंधावर बोलणी सुरू व नवीन विषयांची सुरुवात. | १४४ |

■






# ३.
# जागतिक व्यापार संघटना (WTO) म्हणजे काय?

जागतिक व्यापार संघटना (WTO) ही वेगवेगळ्या देशांच्या सरकारांमधील व्यापारविषयक बोलणी घडवून आणणारी कायमस्वरूपी संघटना असून ती जगातील वस्तू आणि सेवांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन करते. WTO चे मुख्य कार्यालय जिनेव्हा, स्वित्झर्लंड येथे आहे. जागतिक व्यापारातील आचारसंहिता निश्चित करण्याचे काम ही संघटना करते. तिला कायदेशीर आधार असून इंटरनॅशनल मॉनिटरी फंड किंवा जागतिक बँकेसारखीच ती वेगवेगळ्या सरकारांची समन्वयक संस्था असून तिला विशेषाधिकार आहेत आणि सरकारनिरपेक्षताही आहे.

आपल्या अखत्यारीतील बहुराष्ट्रीय व्यापार करारातील उद्दिष्टे मार्गी लावण्याच्या दृष्टीने WTO अंमलबजावणी, प्रशासन, कार्यवाही आणि साधने यासाठी निश्चित चौकट आखून देते. यात खालील बाबींचा समावेश होतो.

१) वाटाघाटींच्या उरुग्वे फेरीत सुधारित केलेला आणि आता गॅट १९९४ मसुदा म्हणून ओळखला जाणारा गॅट मसुदा;

२) बहुराष्ट्रीय व्यापारासंबंधी वाटाघाटींच्या उरुग्वे फेरीतील समग्र निष्कर्ष.

WTO ची निर्मिती गॅटमधून झाली आहे. एप्रिल १९९४ मध्ये मराकेश, मोरोक्को येथे गॅटच्या सदस्यांनी WTO ची स्थापना केली. १ जानेवारी १९९५ ला प्रत्यक्ष कामास प्रारंभ झाला. यावेळी एकूण १२८ सदस्य होते. ही संख्या वाढून १५ एप्रिल २००२ ला १४४ झाली (WTO वार्षिक अहवाल २००२). भारत हा गॅटचा तसेच WTO चा संस्थापक सदस्य आहे.

नुकतेच चीनने १४३ वा तर तैवानने १४४ वा सदस्य म्हणून WTO त प्रवेश केला आहे. बरेच देश सदस्यत्वाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यात नेपाळ, भूतान, अल्जेरिया, कंबोडिया, कझाकस्तान, लेबनॉन, रशियन फेडरेशन आणि


इतर अनेक देशांचा समावेश आहे. या देशांच्या वतीने बोलणी करण्यासाठी एका कार्यगटाची स्थापना करण्यात आली असून वेळोवेळी या कार्यगटाच्या बैठका होत असतात.

## WTO च्या स्थापनेचे करार

- **WTO त वस्तूव्यापारविषयक झालेले करार**
- कर आणि व्यापारविषयक सर्वसाधारण करार - १९९४
- शेतीविषयक करार
- कापड उद्योग व तयार कपड्यांविषयी करार
- व्यापारातील तांत्रिक अडथळे दूर करण्याविषयी करार
- व्यापारविषयक भांडवली गुंतवणुकीसंबंधी उपाययोजना
- कमी किंमतीने (डंपिंग) व्यापार रोखण्यासाठी उपाययोजना
- कर आणि व्यापारविषयक सर्वसाधारण करार - १९९४ ची अंमलबजावणी करण्याविषयी करार
- जहाजावर माल भरण्याअगोदर तपासणी करण्याचा करार
- व्यापारवस्तूच्या मूलस्रोताविषयी नियमांबाबत करार
- आयात परवाना पद्धतीविषयी करार
- सब्सिडी व त्यात समतोल ठेवण्यासंबंधी करार
- व्यापार सुरक्षा देणारा करार
- **सेवा व्यापाराचा सर्वसाधारण करार**
- **बुद्धिसंपदेच्या व्यापाराविषयक पैलूसंबंधी करार**
- **वाद सोडविण्यासाठी करण्यात आलेले नियम व पद्धती यांचा सहमतीदर्शक करार**
- **व्यापार धोरणाचा आढावा घेणारी यंत्रणा**
- **बहुदेशीय करार (या करारावर सर्वच देशांनी सह्या केलेल्या नाहीत)**
- प्रवासी विमानवाहतुकीविषयी करार
- सरकारी खरेदी (वसुली) बाबत करार
- दुग्धव्यवसाय उत्पादनाविषयी करार (१९९८ ला रद्द)
- पशुंच्या मांसविषयक करार (१९९९ ला रद्द)

■






# ४. गॅट आणि WTO मध्ये काय फरक आहे?

गॅट आणि WTO मध्ये खालील फरक आहेत.


| गॅट | WTO |
|---|---|
| गॅट ही एक उत्स्फूर्त अस्थायी व तात्कालिक कार्य करणारी संघटना होती. | WTO ला ठोस कायदेशीर स्वरूप देण्यात आले आहे. सदस्य देशांच्या सरकारांनी व कायदेमंडळाने मान्यता दिलेल्या आंतरराष्ट्रीय ठरावाने WTO ची स्थापना झाली आहे. |
| गॅट हा नियमांचा दस्तऐवज होता. (परंतु त्याला कोणत्याही संस्थेचा कायदेशीर आधार नव्हता) निवडक स्वरूपाच्या बहुराष्ट्रीय करारासंबंधी काही पद्धती त्यात सुचविल्या होत्या. पण करार करणाऱ्या देशांवर ते बंधनकारक नव्हते. | WTO नुसार झालेले करार कायम स्वरूपी व सदस्य देशांना बंधनकारक आहेत. |
| गॅटनुसार वाद सोडविण्याची पद्धत मंदगती व वादी देशांना बंधनकारक नव्हती. | WTO ची वाद सोडविण्याची पद्धत जलदगती व वादींना बंधनकारक आहे. सोप्या शब्दांत गॅट दंतहीन होता, तर WTO ला दात आहेत. |

| गॅट | WTO |
|---|---|
| आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी वाटाघाटी करणे व प्रश्न सोडविणे यासाठी संबंधित देशांना भेटता यावे असे गॅट हे एक व्यासपीठ होते. येथील बोलणी टप्प्याटप्प्याने बराच काळ चालत व कित्येक वर्षांनी निर्णयाप्रत पोहोचत. | WTO सनदशीर मार्गाने स्थापन झालेली नियमाधारित संस्था आहे. येथील चर्चा वेळेच्या बंधनातच पूर्ण करून निर्णय घ्यावा लागतो. WTO च्या सदस्यांना दोन वर्षातून किमान एकदा मंत्रीपातळीवरील बैठक घ्यावी लागते. निर्णय पातळीवर मंत्रीपरिषद सर्वोच्च अधिकारी आहे. |

गॅटचे नियम फक्त वस्तूविषयक व्यापारालाच लावले जात. शेतीसंबंधी बोलणी तांत्रिकदृष्ट्या शक्य होती. परंतु सदस्य देशांना औद्योगिक वस्तूंच्या आयात निर्यातीवरील कर कमी करण्यातच अधिक स्वारस्य होते. उरुग्वे फेरीत सर्वप्रथम शेती, वस्त्रोद्योग व वस्त्रांचा व्यापार यांचा समावेश करण्यात आला. WTO च्या अंतर्गत फक्त वस्तूंच्या व्यापाराचा करार नसून त्यात सेवा, बुद्धिसंपदेचे अधिकार, शेती, वस्त्रोद्योग व वस्त्रे यांच्या व्यापाराचा समावेश होतो.

■




The Economic Times

## ५. WTO चे कार्य कसे चालते?

सदस्य देशांच्या प्रतिनिधींची मंत्रीपरिषद ही WTO चे नेतृत्व करणारी आणि धोरणात्मक निर्णय घेणारी सर्वोच्च समिती आहे. या समितीची दर दोन वर्षात किमान एक बैठक होते. WTO ची सर्व कार्ये सुरळीतपणे पार पडण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही ही समिती करते. WTO अंतर्गत झालेल्या व्यापार करारांच्या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या बाबींसंबंधीही ही समिती निर्णय घेते.

WTO मध्ये, सर्व सदस्य देशांच्या प्रतिनिधींचे बनलेले सर्वसाधारण मंडळ (General Council) असून हे मंडळ सर्व करार आणि मंत्रीपरिषदेचे निर्णय यांच्या अंमलबजावणीवर नियमितपणे देखरेख करते. हे मंडळ 'विवाद निवारण यंत्रणा' आणि 'व्यापार धोरण आढावा यंत्रणा' म्हणूनही भूमिका बजावणारे असते. या प्रत्येक भूमिकेसाठी त्याचे वेगवेगळे अध्यक्ष असतील.

याखेरीज, वस्तूव्यापारविषयक मंडळ, सेवाव्यापारविषयक मंडळ, बुद्धिसंपदा हक्काच्या व्यापारानुषंगिक दृष्टिकोनाविषयी मंडळ या सर्वसाधारण मंडळाला आपले अहवाल सादर करणाऱ्या महत्त्वाच्या यंत्रणा आहेत. या मंडळांना आपापले निहित कार्य कार्यक्षमपणे करण्यासाठी आवश्यकतेनुसार सहाय्यक उपसमित्याही असतात.


सर्वसाधारण मंडळ काही विशिष्ट मुद्द्यांसाठी आणि त्या संबंधी नेमून दिलेले काम करण्यासाठी वेगवेगळ्या 'समित्या' नियुक्त करते.

मंत्रीपरिषद चार वर्षांच्या कालावधीसाठी महासंचालकांची (Director General) निवड करते. हे महासचिव WTO च्या सचिवालयाचे प्रमुख

असतात. सर्वसाधारण मंडळाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांबरहुकूम महासचिव सचिवालयातील सचिव व इतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करतात व त्यांची कर्तव्ये, सेवाशर्ती इत्यादी निश्चित करतात.

गॅट १९४७ मसुद्याला धरून निर्णय सर्वानुमते घेण्याचा रिवाज WTO नेही चालू ठेवला आहे. एखाद्या बाबतीत सार्वमत होत नसेल तर 'एक देश, एक मत' या आधारे दोन तृतीयांश बहुमताने निर्णय घेण्याचीही तरतूद करारात आहे. WTO मधील आजवरचे सर्व निर्णय सर्वानुमते झालेले आहेत.

**WTO ची रचना**









# ६.
# WTO प्रश्नांची व समस्या क्षेत्रांची निवड कशी करते?

WTO ही नियमाधारित यंत्रणा आहे. आजवरचे सर्व करार सहमतीने करण्यात आले आहेत. WTO मध्ये कोणते विषय किंवा समस्या हाताळाव्या याबद्दल अजूनतरी कोणतेही मापदंड ठरलेले नाहीत.

कोणताही नवीन विषय समाविष्ट करावयाचा असल्यास त्यावर सर्व सदस्यांमध्ये चर्चा व्हावी लागते. या चर्चेत विषय समाविष्ट करण्याबद्दल सहमती झाली तरच वाटाघाटींना सुरुवात होते. तरीसुद्धा, WTO कराराच्या प्राक्कथनामध्ये म्हटल्याप्रमाणे राहणीमान उंचावणे, रोजगार वृद्धी व प्रत्यक्ष उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर नियमित वाढ ही उद्दिष्टे संबंधित विषयाने साध्य होतात की नाही हे पाहिले जाते.

नवीन विषय WTO त समाविष्ट करताना सर्वसाधारणपणे खालील पद्धत अनुसरली जाते.

एखादा देश किंवा देशांचा समूह नवीन विषय WTO च्या सर्वसाधारण मंडळासमोर ठेवतो. त्या विषयावर विचारविनिमयार्थ एखादी समिती किंवा अभ्यासगट नेमण्याची विनंतीही केली जाते जो त्या विषयाचा व आनुषंगिक विषयांचा सखोल अभ्यास करू शकेल.

उदाहरणार्थ, बहुराष्ट्रीय व्यापारातील स्पर्धात्मक धोरणासंबंधी WTO त कुठलाही करार नाही. परंतु व्यापार आणि स्पर्धेचे धोरण यांच्या परस्परांवरील

परिणामांचे निरीक्षण करण्यासाठी एक कार्यकारी समिती १९९४ मध्ये नियुक्त करण्यात आली आहे. याच वर्षी व्यापार आणि गुंतवणूक यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास करण्यासाठी एका समितीची नियुक्ती करण्यात आली आहे.

कतार या देशातील दोहा येथे झालेल्या चौथ्या मंत्रीपातळीवरील परिषदेत आणखी दोन समित्यांच्या स्थापनेविषयी निर्णय करण्यात आला. १) व्यापार, कर्ज व वित्तपुरवठा आणि २) व्यापार आणि तंत्रज्ञान हस्तांतरण

अशा कार्यकारी समितीला आपला अहवाल तयार करून तो सर्वसाधारण मंडळासमोर ठेवण्याचे काम करावे लागते. मंत्रीपरिषद या अहवालावरून वाटाघाटी सुरू करायच्या किंवा नाही याबद्दल निर्णय घेते.

सहमतीनंतरच त्या विषयावर वाटाघाटी सुरू होतात. वाटाघाटींच्या शेवटी त्या विषयावर करार झालाच पाहिजे असे नाही.

**WTO मंत्रीपातळीवरील परिषदा**

| बैठक | तारीख/वर्ष | ठिकाण | महत्त्वाच्या उपलब्धी |
|---|---|---|---|
| १ | ९-१३ डिसेंबर १९९६ | सिंगापूर | माहिती तंत्रज्ञानाचा करार व नवीन विषयांचा अंतर्भाव |
| २ | १८-२० मे १९९८ | जिनेव्हा | इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या व्यापाराचा करार जैसे थे |
| ३ | १९९९ | सिएटल (पूर्ण होऊ शकली नाही) | बाजारपेठेत प्रवेश, शेती, व्यापार, सुविधा, ई-कॉमर्स |
| ४ | ९-१४ नोव्हेंबर २००१ | दोहा (कतार) | कार्यवाहीतील अडथळे, पर्यावरण, गुंतवणूक, स्पर्धा, बुद्धिसंपदा हक्क, सरकारी खरेदी (वसुली)त पारदर्शकता, व्यापार सुविधा. तसेच 'व्यापार, वित्त कर्ज पुरवठा' आणि 'व्यापार व तंत्रज्ञान हस्तांतरण अशा दोन नवीन कार्यकारी समित्यांची स्थापना |

(९-१४ सप्टेंबर २००३ या काळात कॅनकुन येथे मंत्रीपरिषदेची ५ वी बैठक झाली. विकसित देशांतील कृषि अनुदानांच्या प्रश्नावरून मोठा वादविवाद झाल्याने कोणत्याही मुद्द्यावर सहमती न होता बैठक आटोपली.) ■





## ७. WTO मध्ये गरीब देशांना काय सवलती देण्यात आल्या आहेत?

विकसनशील व अतिमागासलेल्या गरीब देशांसाठी WTO मध्ये, त्यांना त्यांच्या ठराविक गरजांना तोंड देता यावे यासाठी खास तरतुदी करण्यात आल्या आहेत :

- करारांन्वये पडणाऱ्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी या देशांना अधिक अवधी देण्यात आला आहे.

  उदाहरणार्थ, विकसित देशांनी सर्व सरकारी अनुदानात १९९५ नंतर ६ वर्षांच्या कालावधीत २०% कपात करणे अपेक्षित होते; विकसनशील देशांनी १० वर्षात १३.३% कपात करणे अपेक्षित होते तर अविकसित देशांना अशा प्रकारे कोणतीही कपात करण्याची अपेक्षा नव्हती.

- विकसनशील आणि अतिमागास देशांना विकसित देशांतील व्यापारात अधिक प्रमाणात प्रवेशाची मुभा देऊन व्यापाराच्या संधी वाढविण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत.

  उदाहरणार्थ, जी उत्पादने विकसित देशात विकण्यास याआधी कडक बंधने होती ती शिथिल करून विकसित देशांनी किमान प्रवेशसंधीचे आश्वासन देणे अपेक्षित होते. अशा उत्पादनावर विकसित देशांना त्यांच्या देशांतर्गत

उपभोगाच्या ३% कर लावण्याचे व हा कर २००१ पर्यंत ५% वाढविण्याची मुभा देण्यात आली होती. विकसनशील देशांना असा कर ३% वरून ५% करण्यासाठी २००५ पर्यंत मुभा होती.

- WTO त समाविष्ट देशांनी त्यांचे देशांतर्गत आर्थिक धोरण ठरविताना विकसनशील व मागास देशांच्या आर्थिक हितसंबंधांना बाधा येणार नाही याची काळजी घेणे अपेक्षित आहे.

विकसित देशांनी शेतीउत्पादनावरील आयातनिर्यात करात ६ वर्षात ३६% तर विकसनशील देशांनी १० वर्षात २४% कपात करण्याचे मान्य केले आहे. या करारात अविकसित देशांना असे कोणतेही बंधन नाही.


- विकसनशील व मागास देशांना खास तांत्रिक सहाय्याची तरतूद करण्यात आली आहे. उदा. वस्तूंच्या दर्जाबाबत जबाबदारी निभावण्यासाठी सहाय्य करणे, इ.

नोव्हेंबर २००१ पासून दोहा येथून सुरू झालेल्या चर्चेच्या फेरीत 'जागतिक विश्वस्त निधी' स्थापन करण्यात आला आहे. यासाठी ३० दशलक्ष डॉलरचा बीजनिधी जमविण्याचे उद्दिष्ट आहे. या निधीतून विकसनशील देशांना साधनसंपत्ती उपलब्ध करून देणे तसेच, तांत्रिक सहकार्य/मदत, क्षमता-निर्मितीबाबत अनेक प्रश्नांवर तातडीच्या व आवश्यक धोरणविषयक चर्चा सुरू करणे यांसाठी तरतूद करण्याचा उद्देश आहे.

आगामी जिनेव्हा बैठकीत मागास सदस्य व सदस्य नसलेल्या गरीब देशांच्या समस्यांवर अधिक भर देण्यात येईल.

■






# ८. भारताने WTO चे सदस्य राहणे का आवश्यक आहे?

भारताने WTO चे सभासद व्हावे की नाही यावर मोठे युक्तिवाद चालू आहेत. या प्रश्नाचे खरे उत्तर तर जागतिक व्यापार संघटनेत सामील झाल्यामुळे भारतीय लोकांना काय फायदा होणार? व आपल्या देशाच्या या व्यापार संघटनेकडून काय अपेक्षा आहेत व त्या कितपत पूर्ण होतील? या प्रश्नांच्या उत्तरातूनच मिळेल.

भारतीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी आपल्याला दोन उद्दिष्टे गाठावी लागतील.

- शेती आणि उद्योगांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे.
- गरीबीचे सार्वत्रिक निर्मूलन

भारतात WTO प्रमाणेच नियमाधारित काम करणारी एखादी समन्वयक समिती निर्माण करणे श्रेयस्करच नव्हे तर अत्यावश्यक आहे. त्याऐवजी सतत WTO च्या विरोधात मतप्रदर्शन करण्यात येत आहे व WTO तून बाहेर पडण्यासाठीच जास्त आग्रह धरला जात आहे. आपण WTO चे सदस्य नसलो तर आपण काय करू शकू? हा कळीचा प्रश्न कोणीच कधीही विचारात घेत नाही. किंबहुना, WTO तून बाहेर पडणे आता आगीतून फुफाट्यात पडण्यासारखे होईल.

जर भारताला WTO तून बाहेर पडायचे झाले तर व्यापारी संबंध

असलेल्या इतर सर्व देशांशी असलेले करार आपल्याला स्वतंत्रपणे, अलग अलग तपासावे लागतील, पुन्हा बोलणी करावी लागतील. मेक्सिको व इतर छोटे युरोपियन देश NAFTA, युरोपियन युनियन, ASEAN इ. प्रादेशिक व्यापारी संघटनांशी निगडित आहे. भारत अशा प्रकारे कुठल्याही प्रादेशिक व्यापारी संघटनेशी जोडला गेलेला नाही. दक्षिण आशियासाठी अशी एखादी प्रादेशिक व्यापार संघटना स्थापन करण्याच्या भारताच्या प्रयत्नांचा अजून श्रीगणेशाही झाला नाही. याउलट, WTO च्या माध्यमातून कायदेशीर जागतिक करार होऊन भारत आर्थिक बळाची व मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर बचत करू शकतो.

भारत जर WTO तून बाहेर पडला तर जागतिक राजकारणात एकाकी पडेल. आपल्याला जागतिक पातळीवर 'वाईट' नागरिक होणे झेपणार आहे का? चीनसारख्या देशांनी WTO त का प्रवेश मिळविला आहे? १९४७ साली केवळ २३ देशांच्या सहभागाने गॅटची सुरुवात झाली. ही संख्या वाढत वाढत १९९५ साली WTO ची स्थापना झाली त्यावेळी १२८ देश सभासद झाले. आज ही संख्या १४४ आहे.

यापलीकडे खालील देश WTO चे सभासदत्व मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यासाठी या देशांना एकेका सभासद देशांची मनधरणी करावी लागत आहे. आतापर्यंत, सभासद झालेल्या एकाही देशाने बाहेर पडण्याचा विचारही केलेला नाही. खाली दिलेला तक्ता देश व त्यांनी सर्वप्रथम WTO चा सभासद होण्यासाठी विनंती केली ती तारीख दर्शवितो. हे सर्व देश अद्याप प्रतीक्षेत आहेत.


| अ.नं. | देश | तारीख |
|---|---|---|
| १. | अल्जेरिया | १७ जून १९८७ |
| २. | अंडोरा | २२ ऑक्टोबर १९९७ |
| ३. | अर्मेनिया | १७ डिसेंबर १९९३ |
| ४. | अजरबैजान | १६ जुलै १९९७ |
| ५. | बहामाज | १८ जुलै २००१ |
| ६. | बेलरस | २७ ऑक्टोबर १९९३ |



| अ.नं. | देश | तारीख |
|---|---|---|
| ७. | भूतान | ६ ऑक्टोबर १९९९ |
| ८. | बोस्निया हर्जगोवीना | १५ जुलै १९९९ |
| ९. | कंबोडिया | २१ डिसेंबर १९९४ |
| १०. | केप वर्द | १७ जुलै २००२ |
| ११. | कझाकस्तान | ६ फेब्रुवारी १९९६ |
| १२. | बाओ पिपल्स डेमोक्रॅटिक रिपब्लिक | १९ फेब्रुवारी १९९८ |
| १३. | लेबनान प्रजासत्ताक | १४ एप्रिल १९९९ |
| १४. | पूर्वाश्रमीचे युगोस्लाव रिपब्लिक ऑफ मॅकडोनिया | २१ डिसेंबर १९९४ |
| १५. | नेपाळ | २१ जून १९८९ |
| १६. | रशियन फेडरेशन | १६ जून १९९३ |
| १७. | सामोआ | १५ जुलै १९९८ |
| १८. | सौदी अरेबिया | २१ जुलै १९९३ |
| १९. | सैचेलस | ११ जुलै १९९५ |
| २०. | सुदान | २५ ऑक्टोबर १९९४ |
| २१. | ताजीकिस्तान | १८ जुलै २००१ |
| २२. | टोंगा | १५ नोव्हेंबर १९९५ |
| २३. | युक्रेन | १७ डिसेंबर १९९३ |
| २४. | उझबेकिस्तान | २१ डिसेंबर १९९४ |
| २५. | व्हिएतनाम | ३१ जानेवारी १९९५ |
| २६. | येमेन | १७ जुलै २००० |
| २७. | फेडरल रिपब्लिक ऑफ युगोस्लाव्हिया | ८ फेब्रुवारी २००१ |

(जुलै २००२ पर्यंतची यादी)

■




## ९.
## WTO भारतासाठी आपत्ती की संधी?

WTO ही एक सुनिश्चित नियमावली असलेली एक लोकशाही संघटना असून तिचे सर्व सभासद देश ते नियम पाळण्यास वचनबद्ध आहेत. त्यामुळे, ती कोणतीही छुपी बंधने भारतावर किंवा अन्य कोणत्याही देशावर लादू शकत नाही.

तेव्हा, बाकी चर्वितचर्वण करण्यापेक्षा संयुक्तिक प्रश्न इतकाच उरतो की आपण अशा कायदेशीर संघटनेचे सभासद असावे की नसावे? या प्रश्नाचे केवळ होय किंवा नाही असे उत्तर देणेही शक्य नाही, कारण प्रश्न धमकीचा किंवा भीतीचा नव्हे तर फायदेतोटे काय असतील ते तपासण्याचा आहे.

WTO ची निर्मिती ही काळाची गरज होती हे नजरेआड करून चालणार नाही. WTO शिवाय आंतरराष्ट्रीय व्यापार करणे ही एक मोठी समस्या ठरली असती.


जेव्हा विकसित देश आर्थिक उदारीकरणाचा मार्ग अनुसरू लागले तेव्हा त्यांना अधिक चांगल्या निर्यातसंधीची गरज भासू लागली. महासत्तांनी WTO च्या स्थापनेला विरोध केला तरी त्याचवेळी द. कोरिया, सिंगापूर यांसारख्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत बऱ्यापैकी स्थान असलेल्या देशांनी, विशेषत: भारत व पाकिस्तानसारख्या विकसनशील देशांनी WTO च्या स्थापनेसाठी आग्रह धरला.

आपण हेही लक्षात घ्यायला की मुक्त व्यापार किंवा स्पर्धा हे आर्थिक विकास प्रक्रियेला पर्याय नाहीत, तर ते आर्थिक विकास प्रक्रियेचे फलित आहे.

देशांतर्गत आर्थिक धोरणे संयुक्तिक असतील तर सदस्य देशांना विकासाच्या आणि निर्यातीच्या संधी प्राप्त होण्यात WTO ची निश्चित मदत होते.

कुठलाही अभ्यास न करता पारंपरिक दृष्टिकोनातून WTO ला आंधळा विरोध करणे आता थांबवायला हवे. त्याऐवजी प्राप्त परिस्थितीत व चौकटीत काम करणे अधिक चांगले. WTO तील बोलणी आदानप्रदानाच्या (Give & Take) तत्त्वावर चालतात. त्यामुळे अधिकाधिक लाभ कसा होईल अशी व्युहरचना भारताने करायला हवी. ■






## १०.
## सर्वसामान्य व्यक्तीला WTO ची माहिती असणे का आवश्यक आहे?

सर्वसामान्य व्यक्तीला WTO ची माहिती असणे आवश्यक आहे कारण ती ग्राहक असते. व्यापार आणि व्यापारविषयक धोरण हे प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. मुक्त व्यापाराचा फायदा शेवटी ग्राहकालाच होतो. ग्राहकाला उत्पादनाची विविधता व निवडीचे स्वातंत्र्य प्राप्त होते. स्पर्धेमुळे अधिकाधिक चांगल्या प्रतीच्या वस्तू रास्त किंमतीत उपलब्ध होतात.

आजच्या अत्यंत गुंतागुंतीच्या बाजारव्यवस्थेत ग्राहकाला त्याच्या हक्कांच्या संरक्षणाची हमी मिळायला हवी, त्यांची पायमल्ली होता कामा नये. त्यांची पिळवणूक होता कामा नये यासाठी त्यांना त्यांच्या अधिकारांची आणि त्यांच्या परिणामांची माहिती हवी. नफ्याच्या अंगभूत प्रवृत्तीनुसार बाजारपेठ ग्राहकाच्या हळवेपणाचा फायदा उठवून नफेखोरी करण्यासाठी नवनवीन क्लृप्त्या लढवीतच असते.

WTO-नियंत्रित जागतिक बाजारपद्धतीच्या थोड्याफार ज्ञानावरदेखील ग्राहक औषधे, वाहने, वित्तीय सेवा इ. विविध क्षेत्रातील त्याचे/तिचे ग्राहक म्हणून असलेले अधिकार व फायदे अबाधित ठेवू शकतो.

हे सर्व जाणूनच दोहा येथील जाहिरनाम्यातील परिच्छेद १० आणि ४५ मध्ये म्हटले आहे की,

"WTO ची वाढती सदस्यसंख्या लक्षात घेता आम्ही सर्व देश सामूहिक जबाबदारीची आणि कराराची परिणामकारक अंमलबजावणी व देशांतर्गत व्यवहारात पारदर्शकता आणण्याची ग्वाही देतो. हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सरकार-समन्वयक करार असल्याने त्याची माहिती सर्व जनतेस त्वरित व्हावी व कायद्याने प्रस्थापित मुक्त व्यापाराचा जास्तीत जास्त लोकांना फायदा व्हावा असे प्रयत्न आम्ही सतत करू."

"१ जानेवारी २००५ च्या आत दोहा येथील बोलणी संपविण्यात येतील. मंत्रीपातळीवरील पाचवी फेरी चर्चेत झालेल्या प्रगतीचा आढावा घेईल. काही राजकीय सल्ल्याची गरज असल्यास तो देईल व आवश्यक तो निर्णय घेईल. जेव्हा या चर्चेचे फलित किंवा निष्कर्ष मिळतील तेव्हा मंत्रीपातळीवरील विशेष बैठकीचे आयोजन करून निष्कर्ष स्वीकारण्याचा व त्यांच्या अंमलबजावणीचा निर्णय घेतला जाईल."

■

---

जागतिक व्यापार संस्थेची संपूर्ण माहिती, कार्यवृत्तांत, विविध करार, त्यांची अंमलबजावणी इत्यादी सर्व www.wto.org या वेबसाईटवर मिळते.

---

(ABC of the WTO) या पुस्तिकेच्या प्रकाशकांचा पत्ता
**CUTS Centre for International Trade, Economics & Environment**
D-217, Bhaskar Marg, Bani Park, Jaipur - 302 016. India
E-mail : cuts@cuts.org Website : www.cuts.org

जागतिक व्यापार संस्थेची रचनाच वेगळी आहे. या संस्थेमध्ये, देश लहान असो, मोठा असो; गरीब असो, श्रीमंत असो; त्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाटा लहान असो, मोठा असो - सर्व सदस्यराष्ट्रांना प्रत्येकी एक मत असल्यामुळे आणि गरीब राष्ट्रे संख्येनेतरी जास्त असल्यामुळे आपण काहीतरी मिळवू शकू असं मानायला जागतिक व्यापार संस्थेच्या रूपाने पहिल्यांदा जागा तयार झाली.

**- शरद जोशी**

**कॅनकून : कोण जिंकले, कोण हरले?** या लेखामधून....

निर्मिती व वितरण मूल्य : रु. १०/-